राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीची
पुनर्रचना करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः ग्राकस-२०१८/ प्र.क्र.४६/ ग्रासं-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
तारीखः २४ एप्रिल, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः ग्रासंप-२८००/प्र.क्र.५५५/ग्रासं-२, दिनांक १० मे, २००१.
२) शासन निर्णय क्रमांकः ग्रासंस-११०६/प्र.क्र.१३३८/ग्रासं-२, दिनांक ७ डिसेंबर, २००७.
३) शासन निर्णय क्रमांकः ग्रासंस-११०६/प्र.क्र.१३३८/ग्रासं-२, दिनांक ७ डिसेंबर, २००७.
४) शासन निर्णय क्रमांक : ग्राकस-१५१०/प्र.क्र.४९/ग्रासं-२, दिनांक २४ डिसेंबर, २०१४.
५) शासन निर्णय क्रमांक : ग्राकस-१५१५/प्र.क्र.९०/ग्रासं-२, दिनांक २२ जून, २०१५.
६) शासन निर्णय क्रमांक : ग्राकस-१५१५/प्र.क्र.१५९/ग्रासं-२, दिनांक ७ जानेवारी, २०१७.
७) शासन निर्णय क्रमांक : ग्राकस-१५१५/प्र.क्र.१५९/ग्रासं-२, दिनांक १३ जानेवारी, २०१७.

प्रस्तावना :-

राज्यामध्ये ग्राहक चळवळीला प्रोत्साहन देऊन ही चळवळ गतीमान करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत शासनास सल्ला देण्यासाठी सध्या असलेली राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीची पुनर्रचना करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

शासनाने याबाबत सर्वंकष विचार करुन, खालीलप्रमाणे राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीची पुनर्रचना करण्याबाबतचा निर्णय घेतला आहे.

अ.क्र.	नांव	महसूली विभाग	पदनाम
१	श्री.अरुण देशपांडे	--	अध्यक्ष
२	श्री.किशोर तोताराम लुल्ला	पुणे विभाग	सदस्य
३	श्री.अजय सदाशिव गाडे	अमरावती विभाग	सदस्य
४	श्री.संजय जोशी	औरंगाबाद विभाग	सदस्य
५	ॲड.गौरी दिलीप चांद्रायण	नागपूर विभाग	सदस्य
६	प्रा.दिलीप बाळकृष्ण फडके	नाशिक विभाग	सदस्य
७	श्रीमती कल्पना दास्ताने	कोकण विभाग	सदस्य
८	उप संचालक, वित्तीय सल्लागार व उप सचिव यांचे कार्यालय		सदस्य
९	सहसचिव/उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	--	सदस्य सचिव

२. उक्त समितीची मुदत हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्ष किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी राहील.

३. राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीवर नियुक्त करण्यात येणाऱ्या सदस्यांचा कार्यकाल त्यांच्या नियुक्तींच्या दिनांकापासून तीन वर्ष अथवा पुढील आदेशांपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत राहील.

४. राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीची बैठक :-

(अ) राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीची बैठक दोन महिन्यातून एकदा घेण्यात येईल.

(ब) राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीची बैठक सर्व किंवा काही सदस्यांची नियुक्ती झाली नसली तरीही समितीच्या बैठका नियमितपणे घेण्यात

५. राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीच्या बैठकीची सूचना, कार्यवृत्तात व इतिवृत्त :-

राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीच्या बैठक बोलाविणे सूचना, इतिवृत्त तयार करणे, निर्गमित करणे व त्यानुषंगिक बाबी इत्यादीबाबत सर्व जबाबदारी खाजगी सचिव, राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती यांची राहील.

६. राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीचे कार्ये :-

राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीची कार्ये :-

१) राज्यातील ग्राहक चळवळीला प्रोत्साहन देऊन तिचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाला करावयाच्या उपाययोजनासंबंधी सल्ला देणे.

२) ग्राहक शिक्षण, ग्राहक प्रबोधन व तत्संबंधीच्या कार्यक्रमांचे आयोजन करुन ते राज्यांतर्गत राबविणे.

३) ग्राहक चळवळ, ग्राहक शिक्षण व ग्राहक जागृती याबाबतचे लेख /साहित्य प्रकाशित करणे.

४) राज्यामध्ये जागतिक ग्राहक दिन तसेच राष्ट्रीय ग्राहक दिनाचे कार्यक्रम प्रभावीपणे करणे.

५) ग्राहक हिताच्यासंदर्भात शासनाचे विविध विभाग/उपक्रम यांची कार्यपध्दती, धोरणे ग्राहक हिताची असावीत यासाठी शासनाला वेळोवेळी सल्ला देणे.

६) राज्यस्तरीय ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीसाठी विषय सुचविणे, बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयांचा वेळोवेळी पाठपुरावा करणे.

७) ग्राहकांच्या सुसंवादातून ग्राहक समस्यांचे निराकरण करण्याच्यादृष्टीने जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांच्या बैठका दरमहा घेतल्या जातात किंवा कसे हे पाहणे, त्याचप्रमाणे बैठकींमध्ये घेतलेल्या निर्णयांचा पाठपुरावा होतो किंवा कसे, हे पाहणे.

८) ग्राहक प्रबोधनासंबंधीच्या कार्यक्रमांचे नियोजन करुन ते प्रभावीपणे राबविणे.

७. समितीच्या अशासकीय सदस्यांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार प्रवास भत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय राहतील. तसेच सदर समितीसाठी होणारा खर्च "मागणी क्र. एम-२, मुख्य लेखाशिर्ष - २४०८ - राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती (अनिवार्य), (०४) (०७) (२४०८ ०७०७) या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२५१५४६३७६४०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaskar Baburao Patil

Digitally signed by Bhaskar Baburao Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplier And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bbb17268641691acddf048e6aa2150f79b022d09a6c745e92beb9baeed480e62, serialNumber=c8c342ac9a89937bf462ee75f46842ac6d1fbc12a95dda7bfd1d06d7b79b4191, cn=Bhaskar Baburao Patil
Date: 2018.04.25 15:48:58 +05'30'

(भा. बा. पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
४. सर्व विधानसभा व विधानपरिषद सदस्य,
५. राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीचे सर्व सदस्य.
६. सर्व मंत्रालयीन विभाग,
७. *प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई,
८. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०.सर्व जिल्हाधिकारी
११.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
१२.महासंचालक, यशदा, पुणे,
१३.महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१४.महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१५.महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१६.महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१७.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९.निवासी लेखा अधिकारी, मुंबई,

२०.मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२१.मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२२.प्रधान सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३.सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२४.नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई,
२५.नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई,
२६.वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
२७.उप संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई,
२८. उप संचालक, नागरी पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई,
२९.खाजगी सचिव, राज्य ग्राहक कल्याण समिती, मुंबई,
३०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (व्यापक प्रसिध्दीसाठी)
३१.निवडनस्ती, ग्रासं.२.